

|| वर्ष - 8 | अंक - 206 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 10 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- भारताचा इंग्लंडवर मालिका विजय!
- सामना थांबवल्याने रोहित शर्मा वैतागला
- ही तर 'आप'च्या शेवटाची सुरुवात
- मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांचा राजीनामा

### शिरीष महाराज मोरे यांच्या कुटुंबाला 32 लाखांची मदत

# एकनाथ शिंदेंची संवेदनशिलता...!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा निर्णय घेतला

| पुणे | महाईन्यूज

दोन दिवसांपूर्वी संत तुकाराम महाराजांचे अंकरावे वंशज शिरीष महाराज मोरे यांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली होती. त्यात त्यांनी सुसाईड नोट लिहीत कुणाला किती पैसे देणे बाकी आहेत, याचा उल्लेख केला होता. यात आता सांवेदनशील नेते म्हणून परिचित असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मोरे कुटुंबियांच्या मदतीला धावून आले आहेत. त्यांनी मोरे कुटुंबाला 32 लाख रुपये मदत करण्याचे जाहीर केले आहे. शिंदे यांनी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मोरे कुटुंबंला मोठा दिलासा जरी मिळाला असला तरी मुलगा गेल्याचे दुःख त्यांच्या मनात आहे.





एकनाथ शिंदे यांनी 32 लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला असून आमदार विजय शिवतारे यांनी ही मदत आजच पोहचवली आहे. शिवतारे यांनी ही मदत मोरे कुटुंबियांकडे सुपूर्त केली आहे. आत्महत्या कारण्याअगोदर मोरे महाराजांनी माझे कर्ज फेडण्यासाठी मित्रांनी माझ्या घराच्याना मदत करावी, असे आवाहन केले होते. त्यांच्याच आवाहनाला साद दिली आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोरे कुटुंबाला आर्थिक विवंचनेतून बाहेर काढण्यासाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे 11 वे वंशज प्रसिद्ध हभप शिरीष महाराज मोरे यांच्या आत्महत्येनंतर फक्त वारकरी संप्रदाय नाही संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. आर्थिक अडचणीत शिरीष मोरे यांनी आपलं आयुष्य संपवलं, ही बाब एकनाथ शिंदेंना समजताच त्यांनी मोरे कुटुंबियांना 32 लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. आता एकनाथ शिंदे हे मोरे कुटुंबियांच्या मदतीला धावून आल्याचे बघायला मिळत आहे.

### कुणाकुणाचं कर्ज?

शिरीष महाराजांवर 32 लाख 35 हजारांचे कर्ज होते. मुंबईतल्या सिंघवजींचे 17 लाखाचे, बचत गटाचे 4 लाखांचे, सोने गहाण ठेवलेले त्याचे 1 लाख 30 हजार, वैयक्तिक कर्ज 2 लाख 25 हजार, चारचाकी वाहन 7 लाखाचे कर्ज आणि किरकोळ देणी 80 हजार असे एकूण 32 लाख 35 हजारांचे कर्ज होते. काही दिवसांवरच लग्न असताना शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्येसारखे पाऊल उचलण्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला होता.

### 'येत्या 5 वर्षात मावळचा कायापालट करणार'

## मावळ विधानसभेचे आमदार सुनील शेळके यांची ग्वाही

| पिंपरी | महाईन्यूज

मावळ : आपण सर्वांनी आम्हाला विकासकामांसाठी निवडून दिले आहे. त्या विकासकामांसाठीच आम्हाला बोलवा, अन्य कार्यक्रमाला बोलावू नका, अशी विनंती वजा आवाहन आमदार सुनील शेळके यांनी केले. वडगाव मावळ येथे शनिवारी (दि.८) महायुती व मित्र पक्षांच्या वतीने आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार शेळके बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी, पुढील पाच वर्षात तालुक्यातील शिल्लक राहिलेली विकासकामे मार्गी लावू व तालुक्याचा पूर्ण कायापालट करू, अशी ग्वाही देखील मावळच्या जनतेला दिली.



याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आरपीआयचे (आठवले गट) प्रदेश सचिव सूर्यकांत वाघमारे, एसआरपी पक्षाचे अध्यक्ष रमेश साळवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, शिवसेना तालुका प्रमुख राजेश खांडभोर, मावळ भाजपा प्रभारी भास्करराव म्हाळसकर, तळेगाव शहर भाजपा अध्यक्ष संतोष दाभाडे, लोणावळा शहरातील भाजपा नेते देविदास कडू, गणेश ढोरे, विठ्ठलराव शिंदे, शरद हुलावळे, साहेबराव कारके, दिपाली गराडे आदी मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### महायुतीच्या पाठीशी उभे रहावे- बारणे


खासदार श्रीरंग बारणे यांनीही आपले मनोगत व्यक्त करीत, राज्यात महायुतीचे कणखर सरकार आले असून महायुतीवर विश्वास ठेवून आम्ही मावळचा विकास करणार आहोत. यासाठी आपण सर्वांनी मनापासून भक्कमपणे महायुतीच्या पाठीशी उभे राहून साथ द्यावी, असे आवाहन बारणे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष गणेश खांडगे यांनी केले. सूत्रसंचालन राज खांडभोर यांनी केले. किशोर सातकर यांनी आभार मानले.

# सरकारला धारेवर का धरत नाही?

## पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचा सवाल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कांद्याची भाववाढ झाल्यानंतर सरकारला सत्तेतून खाली खेचणारे भारतीय मतदार स्वच्छ पाणी, शुद्ध हवा या मुद्द्यांवरून सरकारला धारेवर का धरत नाहीत?,' असा परखड सवाल लडाख येथील पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी रविवारी उपस्थित केला. 'सुरा भोसकणारा मोठा गुन्हेगार असतो. त्याप्रमाणे चंगळवादी जीवनशैलीमुळे स्वतःसह इतरांचेही आयुष्य अनैसर्गिकपणे घटविणाराही गुन्हेगार नाही का?,' याकडे त्यांनी लक्ष वेधले.**



फ्रेंड्स ऑफ लडाख, फ्रेंड्स ऑफ नेचर पुणेतर्फे गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेमध्ये सोनम वांगचुक यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटचे गुरुदास नूलकर, प्रा. प्रीती मस्तकर, आयोजक संस्थेचे संतोष ललवाणी, रुपेश सरोदे, प्रीती पुष्पा-प्रकाश या वेळी उपस्थित होते.'शहरातील नागरिक साधेपणाने जगल्यास डोंगराळ भागातील नागरिकांना 'साधे' जीवन तरी मिळेल,' अशी टिप्पणी करून सोनम वांगचूक यांनी लडाखच्या आंदोलनाला पुण्यासह देशभरातून मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. 'लडाखमधील प्रस्तावित वीजनिर्मिती प्रकल्पामुळे चारावाह्यांचा उदरनिर्वाह संपुष्टात येण्याची शक्यता असून,दिल्लीतील चंगळवादासाठी वीजपुरवठा केला जाणार असेल, तर आम्हाला नक्कीच वाईट वाटेल. लडाखच नव्हे, तर देशाच्या कानाकोपऱ्यात पर्यावरणाच्या रक्षणासाठी विविध गट लढाई लढत असून, त्यांच्या एकजुटीची गरज आहे. त्यासोबतच धर्म, न्यायव्यवस्था अद्ययावत करणे ही काळाची गरज आहे,' याकडे त्यांनी लक्ष वेधले.पुण्यातील मुळा-मुठा नदीसुधार प्रकल्पाला विरोध दर्शवित वांगचुक यांनी नदी पुनरुज्जीवन चळवळीला पाठिंबा दर्शविला. संतोष ललवाणी यांनी प्रास्ताविक केले.डी.जे.फाउंडेशनचे दिलीप जैन यांनी मनोगत व्यक्त केले.कांद्याची भाववाढ झाल्यानंतर सरकारला सत्तेतून खाली खेचणारे भारतीय मतदार स्वच्छ पाणी, शुद्ध हवा या मुद्द्यांवरून सरकारला धारेवर का धरत नाहीत?,' असा परखड सवाल लडाख येथील पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी रविवारी उपस्थित केला. ध्ये सोनम वांगचुक यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटचे गुरुदास नूलकर, प्रा. प्रीती मस्तकर, आयोजक संस्थेचे संतोष ललवाणी, रुपेश सरोदे, प्रीती पुष्पा-प्रकाश या वेळी उपस्थित होते.'शहरातील नागरिक साधेपणाने जगल्यास डोंगराळ भागातील नागरिकांना 'साधे' जीवन तरी मिळेल,' अशी टिप्पणी करून सोनम वांगचूक यांनी लडाखच्या आंदोलनाला पुण्यासह देशभरातून मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. 'लडाखमधील प्रस्तावित वीजनिर्मिती प्रकल्पामुळे चारावाह्यांचा उदरनिर्वाह संपुष्टात येण्याची शक्यता असून, दिल्लीतील चंगळवादासाठी वीजपुरवठा केला जाणार असेल, तर आम्हाला नक्कीच वाईट वाटेल.

### नागरिकांना 'साधे' जीवन तरी मिळेल

लडाखच नव्हे, तर देशाच्या कानाकोपऱ्यात पर्यावरणाच्या रक्षणासाठी विविध गट लढाई लढत असून, त्यांच्या एकजुटीची गरज आहे. फ्रेंड्स ऑफ लडाख, फ्रेंड्स ऑफ नेचर पुणेतर्फे गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेमध्ये सोनम वांगचुक यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटचे गुरुदास नूलकर, प्रा. प्रीती मस्तकर, आयोजक संस्थेचे संतोष ललवाणी, रुपेश सरोदे, प्रीती पुष्पा-प्रकाश या वेळी उपस्थित होते.'शहरातील नागरिक साधेपणाने जगल्यास डोंगराळ भागातील नागरिकांना 'साधे' जीवन तरी मिळेल,' अशी टिप्पणी करून सोनम वांगचूक यांनी लडाखच्या आंदोलनाला पुण्यासह देशभरातून मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. 'लडाखमधील प्रस्तावित वीजनिर्मिती प्रकल्पामुळे चारावाह्यांचा उदरनिर्वाह संपुष्टात येण्याची शक्यता असून, देशाच्या कानाकोपऱ्यात पर्यावरणाच्या रक्षणासाठी विविध गट लढाई लढत असून, त्यांच्या एकजुटीची गरज आहे.

# पक्ष्यांच्या हत्येवरही बंदी : आश्चर्य वाटणार नाही

## भविष्यात रेड्याच्या हत्येवर बंदी येऊ शकेल : लेखक शाहू पाटोळे

।पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'आपल्या देशामध्ये गोवंश हत्येवर बंदी आहे. भविष्यात यमाचे वाहन म्हणून रेड्याच्या हत्येवर बंदी येऊ शकेल. सध्याचा काळच असा आहे की मत्स्यावतार, वराह अवतार म्हणून त्या त्या पशू-पक्ष्याच्या हत्येवर बंदी आली, तरी आश्चर्य वाटणार नाही, अशी टिप्पणी 'दलित किचन ऑफ महाराष्ट्र' या पुस्तकाचे लेखक शाहू पाटोळे यांनी रविवारी केली.**




विचारवेध असोसिएशन आयोजित सहाव्या विचारवेध संमेलनात शाहू पाटोळे यांच्याशी अनुवादक भूषण कोरगावकर यांनी संवाद साधला. त्यावेळी पाटोळे बोलत होते.'अमूक अन्न खाल्याने तमुक धर्माचा अपमान होतो,हे खोटे आहे. सगळे हिंदू शाकाहारी नाहीत. मांसाहार चांगला आहे, याचा प्रचार करावा लागत नाही. पण, शाकाहार चांगला आहे,हे सांगावे लागते, हे लक्षात घेतले पाहिजे. खाद्यसंस्कृती धर्माशी जोडणे चुकीचे आहे, असे मत पाटोळे यांनी व्यक्त केले.पाटोळे म्हणाले, 'पूर्वापारपासून सर्वजण ' अन्न हे पूर्ण ब्रह्म' ऐकत आल्यामुळे ' अन्न हे अपूर्ण ब्रह्म' हा शब्दप्रयोगच लक्षात घेतला जात नाही. हे पुस्तक वाचणाऱ्या परदेशातील वाचकांना हिंदू मांसाहार करतात, यावर विश्वास बसत नाही. यात लपविण्यासारखे काय आहे? अमूक अन्न खाल्याने तमुक धर्माचा अपमान होतो,हे खोटे आहे. खाद्यसंस्कृतीप्रमाणेच भाषा संस्कृतीदेखील असते. प्रमाण मराठी भाषेपेक्षा आमची मराठी अधिक समृद्ध आहे, असे मी सांगू शकतो.'आहारात बदल होत राहणार. ती अपरिहार्य प्रक्रिया आहे. पण, सक्तीने हे बदल होऊ नयेत. संस्कृती सुटी-सुटी नसते. खाद्य हे आपल्याकडे धर्माशी जोडले गेले आहे. प्रत्यक्षात खाद्यवैविध्य अनेक इतर घटकांशी जोडलेले आहे. जात, वर्ण व्यवस्था जितक्या जास्त, तितक्या खाद्य संस्कृती अधिक, हे लक्षात घेतले पाहिजे.

### मांसाहारासारखे विशिष्ट आहार वाईट

भाषेत जातीय, वर्णीय भेद आहेत,तसे खाद्यातही भेद आहेत. हे भेद उतरंडीनुसार वरून खाली आले आहेत. कोणी काय खावे,हे सरकारने ठरवू नये. मांसाहारासारखे विशिष्ट आहार वाईट आहे, अशी अंधश्रद्धा पसरवली जात आहे.'कमी पाणी, तुषार सिंचन, कीटकनाशक आल्याने रानभाज्याही जवळपास संपुष्टात आल्या आहेत, असे निरीक्षणही पाटोळे यांनी नोंदवले.कोरगावकर म्हणाले, 'भाषा ही एका वर्गाच्या हातात गेल्याने अनेक गोष्टी लपून राहिल्या. दलित, आदिवासी, ख्रिश्चन, भटके असे सगळ्यांचे शब्द, पाककृती साहित्यात आले पाहिजे. 'अन्न हे अपूर्ण ब्रह्म'चे इंग्रजी भाषांतर करताना काम सोपे नव्हते.'



## चिखली कुदळवाडी भागात

# सलग दुसऱ्या दिवशी मोठी कारवाई!

## 607 बांधकामांवर फिरवला बुलडोझर





। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चिखली येथील कुदळवाडी भागात आरक्षित जागा आणि विकास रस्त्यांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांवर सलग दुसऱ्या दिवशी निष्कासनाची कारवाई करण्यात आली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि क्षेत्रीय धडक कारवाई पथकांमार्फत करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये आज ६८ लाख ७८ हजार चौरस फूट बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. त्यामध्ये सुमारे ६०७ बांधकामांचा समावेश होता.**

महापालिका आणि पोलीस यंत्रणेने संयुक्तरित्या राबविलेल्या या कारवाईमध्ये पहिल्या दिवशी २२२ आणि आज दुसऱ्या दिवशी ६०७ बांधकामे निष्कासित करण्यात आली. पोलीस आयुक्त विनयकुमार चोबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, कार्यकारी अभियंता सुनिल बागवानी यांच्यासह उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते. अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या होत्या.

> “ महापालिकेच्या आरक्षित जागेवर तसेच डिपी रस्त्यांवर असलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांवर ब्लॉकनिहाय अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही ही कारवाई सुरू राहणार आहे. यामध्ये ज्यांचे साहित्य किंवा मशिनरी असतील त्यांनी त्या तात्काळ काढून घेऊन महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# शिक्षणाच्या गुणवत्तेत 'धाक नवे जिव्हाळा हवा!



## भूमिका

**आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढल्या आहेत. लोकसंख्या वाढली आहे. त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे. बेरोजगारी वाढल्यामुळे स्पर्धा वाढल्या आहेत. स्पर्धा वाढल्यामुळे शिक्षण घेत असलेल्या शाळकरी मुलांमध्ये वाढत असलेली गुणांची स्पर्धा चिंतेचा विषय ठरत आहे. खरतर जीवन जगतांना प्रत्येक माणसाला यश अपयश येणारच. यश-अपयश, जय-पराजय ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.**

जीवनात यश आले की माणूस आनंदी होतो व अपयश आले की माणूस दुःखी होतो. काही माणसे दुःखात खचून जातात. ते नैराश्यामुळे जीवनात काही उरत नसल्याचे समजत आत्महत्या म्हणजे काय हेही ज्या वयात कळत नाही ती लहान-लहान कोमल मुले आज आत्महत्या करून आपले जीवन अर्ध्यावरती सोडून जीवनयात्रा संपवत असल्याचे चित्र आज आसपासच्या परिसरात दिसून येत आहे. आज बालकांमध्ये नैराश्य पसरलेले दिसून येते. आज लहान मुले आत्महत्तेस प्रवृत्त होताना दिसतात. अनाठाई अपेक्षांचे ओझे त्यांच्या मानगुटीवर असल्यामुळे त्यांच्यातील बालपण खरतर हरवून गेले आहे. यश अपयशाचा सामना करतांना ती थकून जातात.




पालकही आज आपल्या मुलांना तुला इतके गुण मिळाले, इतके मिळाले पाहिजे होते, ये तू या क्षेत्रात जायला पाहिजे, तू हे बनले पाहिजे, तू ते बनले पाहिजे, तू हे केले पाहिजे, तू ते केले पाहिजे. आज पालक मुलांकडून प्रमाणापेक्षा जास्त अपेक्षा व्यक्त करू लागले आहे. पालक अनेक अपेक्षा आपल्या मुलांवर त्यांच्या क्षमता लक्षात न घेता त्यांच्यावर लादतात. मुलांकडून अपेक्षा करू नये असे ही नाही परंतु त्यांची क्षमता लक्षात घ्यायला हवे. अपयशाने खचून जाऊन हे बालमन आत्महत्या करतात. काही पालक मुलांना मारून, मुटकून, दाम-दाटून, दबाव आणून हवे ते प्रयत्न करायला लावतात. त्यातून मुलं कधी कधी नापास होतात, तर काही वेळा अभ्यास न केल्याने, तर कधी कधी अभ्यासापेक्षा जास्त टुकाऱ्या केल्याने तो नापास होऊ शकतो. परंतु नापास झाला म्हणजे सर्व संपले असे नाही ना! सततच्या शारीरिक व मानसिक ताणामुळे लहान मुले मानसिक दृष्ट्या खचून जातात. ती एकलपोटी बनतात. मुले कोणाशी बोलत नाही. शाळेत देखील मुले एकाकी पडतात. त्यांना आयुष्यात काही आनंद उत्साह आहे, हेच पटत नाही. अशा पालकांनी मुलांना वेळीच समजून घेतले पाहिजे. त्यांच्याशी संवाद वाढवायला पाहिजे. नाहीतर मुलांचा एक्कलकोंडेपणा त्यांना खायला उठतो आणि त्यातच ही मुले काही बरं वाईट करून घेण्याची अर्थात आत्महत्या करण्याची शक्यता वाढते."राईस प्लेट तयार आहे? अशी पाटी रेस्टॉरंट वरती लावलेली असते. आपण आत जायचं एक राईस प्लेट ऑर्डर केली की गरमागरम प्लेट तयार. आपण मस्त आस्वाद घ्यायचा. राईस प्लेटचं ठिकं आहे हो.... पण आजच्या स्मार्ट युगात जिथे एका क्लिकवरती जगभरातील कोणतीही माहीती हजर होते, तिथे विद्यार्थ्यांना वाटतं की यश ज्याला आपण सक्सेस म्हणतो ते पण असंच एका ऑर्डर वा क्लिकवरती मिळावं. त्यासाठी पेलावा लागणारा संघर्ष आणि झटण्याची वृत्ती मुलांमधे कमी होत चालली आहे. म्हणूनच आपण अपयशी होत आहोत हे जाणवलं ही ते पचविण्याची क्षमता त्यांच्यात नसते किंवा रूजवली जात नाही. धाक हा नैतिक असावा पण सोबतच पाठीवर हात आहे हा विश्वास म्हणजे जिव्हाळा पण असावा. जी प्रक्रीया वर्षभर चालणारी आहे त्यासाठी परीक्षा तोंडावर आली असतांना दबाव टाकून काहीही साध्य होऊ शकत नाही. पालक जसे यशाचे दिलखुलास साथीदार होतात तसे त्यांनी अपयशाचे अजून खंबीर साथीदार व्हायला हवे. आपण जसं अन्न शिजवतो ना, त्याचा कणं अन् कणं उकळतो तेव्हा त्याला चव येते. आयुष्याचंही तसचं आहे. आयुष्याही शिजवतं ठेवावं लागतं, त्याचा क्षण अन् क्षण उकळावा लागतो. तेव्हा त्याला चव येते. हे संस्कार आपण मुलांवरती करायला हवे", असे तज्ञ मार्गदर्शन पहल इन्स्टिट्युट बुलढाणाचे संचालक निखिल श्रीवास्तव यांनी केले आहे. आज आपल्या समाजात विभक्त कुटुंब पद्धत रुजत आहे. त्यामुळे लहान मुलांकडे पालकांचे दुर्लक्ष होते. काही पालक आपल्या मुलांना वेळ देत नाही. मुलांना नेमके जेव्हा संभाषणाची, संवादाची आवश्यकता असते नेमके तेव्हाच पालकांची साथ मिळत नाही. म्हणून पालकांनी नेहमी आपल्या मुलांसोबत संभाषण, संवाद साधायला हवे. आपल्या मुलांना काय आवडते? काय आवडत नाही? कोणत्या गोष्टीत मुलांना रुची आहे? कोणता विषय मुलांना अवघड जातो? मुलांना कोणती मदत हवी आहे?

## संपादकीय »

### आहे बहुमत

***मग काँग्रेसकालीन राष्ट्रपतींवर भाजप नेते इतकी वर्षे टीका करत आले आहेत त्याचे काय? भाजपच्या होयबांचा संताप व्हावा असे सोनिया गांधी म्हणाल्या तरी काय?***

लोकशाहीत विरोधी पक्षाचे काम असते, सत्ताधाऱ्यांच्या उणिवा, धोरणातील त्रुटी संसदीय मर्यादांचे पालन करत मांडणे. हे वास्तव लक्षात घेतले तर सोमवारी संसदेत राहुल गांधी यांनी केलेले भाषण सर्व मर्यादांचे पालन करणारे आणि नियमाधीन होते. असे असताना त्यांचे भाषण संसदीय नोंदीतून काढून टाका, त्यांच्यावर हक्कभंग आणा, त्यांना ही शिक्षा करा, ती कारवाई करा अशा सत्ताधारी पक्षीयांच्या मागण्या त्यांच्या राजकीय, एकंदर बौद्धिक आणि सांसदीय समजाची कीव करावी अशा ठरतात. खरेतर सत्ताधारी पक्षाचे मोजके काही सोडले तर अन्यांची कुवत संसदेतील बाके बडवत 'मोदी मोदी' असा जयघोष करण्यापुरतीच आहे, हे काही आता लपून राहिलेले नाही. कारण आपले लांगूलचालन, लाळघोटेपणा, हुजरेगिरीची वृत्ती लपवावी असेही या सर्वांस आता वाटेनासे झाले आहे इतकी ही मंडळी सपक आणि पचपचीत आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण विभागात गेल्या काही दिवसांपासून अनेकांची कामे मार्गी लावण्यासाठी दलालांचा सुळसुळाट निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या प्रत्येक कार्यालयात दलालांनी आपले बस्तान मांडले असून खाबु गिरीचा फटका अनेक शिक्षक, कर्मचाऱ्यांना बसत आहे.

# शिक्षण विभागातील दलालांचा बंदोबस्त करा..!

सबब या दलालांचा बंदोबस्त करून शिक्षक कर्मचाऱ्यांचे हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन 'शिक्षण विश्व' करीत आहे.गेल्या काही महिन्यांमध्ये शिक्षण विभागाला भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. शिक्षण विभागातील अनेक अधिकाऱ्यांकडे करोडो रुपयांचे घबाळ सापडले आहे. नाशिक विभागात अनेक प्रकरण समोर आली आहेत. विदर्भातील चंद्रपूर,नागपूर, आणि अमरावती या ठिकाणी सुद्धा अधिकारी अडकले आहेत. पवित्र समजल्या जाणाऱ्या शिक्षण विभागाची प्रतिमा या दलालांनी कलंकित करून टाकली आहे. शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक, पंचायत समिती स्तरावरील गट शिक्षणाधिकारी कार्यालय, वेतन निश्चिती व पडताळणी विभाग, लेखाधिकारी कार्यालय ही दलालांची अड्डे बनले आहेत. ही सर्व कार्यालये सायंकाळी गर्दीने फुलून गेलेले असतात हे सत्य आहे. शिक्षक



कर्मचाऱ्यांच्या व शाळांच्या कामांमध्ये नवीन शाळा मान्यता, तुकडी मान्यता वाढ, विषय वाढ, दर्जा वाढ मान्यता, शाळा हस्तांतर मान्यता, खाते मान्यता, प्रथम मान्यता, स्वमान्यता, शिक्षकांची वैयक्तिक मान्यता, कर्मचाऱ्यांची वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी क्रमांक मिळवणे, संकेतांक क्रमांक मिळवणे, अनुदान मान्यता प्रकरणे, पेन्शन व भविष्य निर्वाह निधीची प्रकरणे, रजा रोखीकरणाची प्रकरणे, वैद्यकीय प्रलंबित बिले काढणे, वेतन निश्चिती व पडताळणी करणे, आरटीई शुल्क प्रतिपुर्ती करणे, बोर्डाची मान्यता मिळवणे इत्यादी कामांची यादी आपल्या पुढे सादर करता येईल. कहर म्हणजे राज्य /राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळवण्यासाठी आणि तो मिळवून देण्यासाठी दलालांची भलीमोठी टोळी राज्यात सक्रिय झाली आहे. या सर्व प्रकरणांमध्ये कोणती ना कोणती त्रुटी काढून ही प्रकरणे प्रलंबित ठेवले जातात. मुख्याध्यापक, शिक्षक,कर्मचारी चकरा मारून थकले की फायलींवर पेन्सिलने शेरे मारल्या जातात. अशा त्रुटी पूर्ण फाईलींवर लक्ष्मी चे वजन ठेवले की ह्याच फायली तात्काळ निकाली काढल्या जातात. या संबंधित कार्यालयात अनेक दलाल तळ ठोकून बसले आहेत. काही मोठ्या संस्थांनी आपली अनेक कामे करून घेण्यासाठी खास दलालांची नियुक्ती केली आहे. नुकताच अल्पसंख्यांक आयोगाने अकोला येथे अशा शिक्षण संस्था व संबंधित दलालांचा चांगला समाचार घेतला होता.शेष म्हणजे महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या सर्वोच्च सभागृहात शिक्षकांचे व पदवीधरांचे मिळून १४ शिक्षक पदवीधर आमदार आहेत. खरंतर शिक्षक कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी ही त्यांची आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ...लाईन वहाँ से शुरू हो जाती है!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नवी मुंबईत वक्तव्य

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मी वाहनात, कार्यालय, घर, कार्यक्रमात येताना कुठेही असू लोकांची निवेदने घेत असतो. हम जहाँ खडे होते है, लाईन वहाँ से शुरू हो जाती है...मी जिथे उभा राहतो, तिथून जनसेवा सुरू होते. तसेच मी कधीही दरबारी राजकारण केले नाही असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नवी मुंबईत म्हणाले. काही दिवसांपूर्वीच ठाण्यात जनता दरबार भरविण्याचे विधान वन मंत्री गणेश नाईक यांनी केले होते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या विधानाने आता नवी मुंबईत राजकीय चर्चा रंगू लागल्या आहेत.**



नवी मुंबई येथील ऐरोलीमध्ये शनिवारी रात्री शिवसेनेचा (शिंदे गट) मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी भाषणातून विरोधकांवर टीका केली. मी कधीही स्वत:ला नेता समजलो आणि समजणारही नाही. कार्यकर्ते आपल्याला मोठे करतात. दु:ख, अडचणीमध्ये नेत्यांनी उभे राहिले पाहिजे ही कार्यकर्त्यांची अपेक्षा असते. आपण इतके केले तर हा कार्यकर्ता आपल्यासाठी अहोरात्र काम करत जीवाची बाजी लावायला तयार असतो असे शिंदे म्हणाले. संपूर्ण राज्यभरातून शिवसेनेत पक्षप्रवेश होत आहेत. शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. शिवसेना सर्वसामान्य नागरिकांशी बांधिल आहे. भारतात २३ राज्यांमध्ये शिवसेना आहे.

मी काल ही कार्यकर्ता म्हणून काम करत होतो, आजही करत आहे आणि उद्याही कार्यकर्ता म्हणूनच काम करणार आहे. बाळासाहेब आपल्याला सवंगडी समजायचे. परंतु त्यांच्या पश्चात काही लोक आपल्याला घरगडी समजू लागले होते. खरा वाघ कोण आणि वाघाचे पांघरून घेतलेले लबाड कोल्हे कोण हे जनतेने दाखवून दिले आहे अशी टीका देखील त्यांनी केली.मी कधीही खूर्चीसाठी कासावीस झालो नाही. कधीही तडजोड करणार नाही. कारण मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे. माझ्या प्रत्येक रक्ताच्या थेंबावर माझ्या लाडक्या बहिणींचा, लाडक्या भावांचा, माझ्या लाडक्या शेतकऱ्यांचा अधिकार आहे. पायाला भिंगरी लावून आम्ही काम केले आहे. महायुतीत मी, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आम्ही एक टीम म्हणून काम केले. अनेक योजना, प्रकल्प आणले. इतिहासात नोंद होतील इतके आम्ही निर्णय घेतले. तसेच कोणताही भूमिपूत्र घरापासून वंचित राहणार नाही.

ही खात्री मी देतो असेही शिंदे म्हणाले. आपण इतके केले तर हा कार्यकर्ता आपल्यासाठी अहोरात्र काम करत जीवाची बाजी लावायला तयार असतो असे शिंदे म्हणाले.संपूर्ण राज्यभरातून शिवसेनेत पक्षप्रवेश होत आहेत. शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. शिवसेना सर्वसामान्य नागरिकांशी बांधिल आहे. भारतात २३ राज्यांमध्ये शिवसेना आहे. मी काल ही कार्यकर्ता म्हणून काम करत होतो, आजही करत आहे आणि उद्याही कार्यकर्ता म्हणूनच काम करणार आहे. बाळासाहेब आपल्याला सवंगडी समजायचे. परंतु त्यांच्या पश्चात काही लोक आपल्याला घरगडी समजू लागले होते. खरा वाघ कोण आणि वाघाचे पांघरून घेतलेले लबाड कोल्हे कोण हे जनतेने दाखवून दिले आहे.

### मी कधीही राजकारण केले नाही


मी कधीही खूर्चीसाठी कासावीस झालो नाही. कधीही तडजोड करणार नाही. कारण मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे. माझ्या प्रत्येक रक्ताच्या थेंबावर माझ्या लाडक्या बहिणींचा, लाडक्या भावांचा, माझ्या लाडक्या शेतकऱ्यांचा अधिकार आहे. पायाला भिंगरी लावून आम्ही काम केले आहे. मी वाहनात, कार्यालय, घर, कार्यक्रमात येताना कुठेही असू लोकांची निवेदने घेत असतो. हम जहाँ खडे होते है, लाईन वहाँ से शुरू हो जाती है...मी जिथे उभा राहतो, तिथून जनसेवा सुरू होते. तसेच मी कधीही दरबारी राजकारण केले नाही असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नवी मुंबईत म्हणाले. काही दिवसांपूर्वीच ठाण्यात जनता दरबार भरविण्याचे विधान वन मंत्री गणेश नाईक यांनी केले होते.

# संगमनेर मध्ये प्रथमच आढळला रानगवा

## मात्र अज्ञात वाहनाच्या धडकेत रानगव्याचा दुर्दैवी मृत्यू

। संगमनेर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संगमनेर तालुक्यामध्ये यापूर्वी कधीही न दिसलेल्या रानगव्याचे वास्तव्य आढळून आले. मात्र या रानगव्याचा अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने रक्तबंबाळ होऊन, तडफडून मृत्यू झाला. या महामार्गाला प्राण्यांना जाण्या येण्या साठीची मार्गिका असती, तर कदाचित या त्याला जीवन मिळाले असते. गव्याच्या अशा प्रकारच्या मृत्यूने प्राणी प्रेमींमधून नाराजीची भावना व्यक्त करण्यात आली.**



पुणे नाशिक मार्गावरील संगमनेर तालुक्यातल्या डोळासने गावच्या हद्दीत काल पहाटेच्या सुमारास हा प्रकार झाल्याचे उघडकीस आले. पहाटेच्या अंधारात गवा महामार्ग ओलांडण्याच्या प्रयत्नात होता. तो महामार्गावर येताच भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्याला जोराची धडक दिली. यात गंभीर जखमी झालेला गवा रक्तबंबाळ अवस्थेत तेथेच तडफडत पडून होता. दिवस उजाडताच शाळकरी विद्यार्थी आणि डेअरीत दूध घालण्यासाठी निघालेल्या शेतकऱ्यांच्या नजरेस घायाळ अवस्थेतील गवा पडला. त्यानंतर मार्गावरून जाणारे वाहन चालकही तेथे थांबले. या भागात प्रथमच दिसलेला हा प्राणी पाहण्यासाठी लोकांनी तेथे खूप गर्दी केली. माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारीही तेथे दाखल झाले. परंतु तोपर्यंत गोव्याचा मृत्यू झाला होता. त्याचे धूड ताब्यात घेत वन कर्माचाऱ्यांनी शवविच्छेदन केले. लगतच्या अकोले तालुक्यात असलेले कळसुबाईपठार भागातील डोंगररांगांमध्ये विविध प्राणी प्राण्यांचा अधिवास आहे. या भागात सर्वाधिक प्रमाणात बिबटे, तरस आदी प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर अधिवास असल्याचे आढळून आले आहे. रानगव्यासारखा महाकाय प्राणी आढळल्याची अधिकृत नोंद यापूर्वी कोठेही नाही. जुन्नर तालुक्यातून अथवा माळशेज घाटातून भरकटत हा गवा संगमनेर तालुक्यातल्या पठार भागात पोहोचला असावा.

### प्राधिकरणाला कधी जाग येणार ?


पुणे नाशिक महामार्ग बांधताना त्यात अनेक त्रुटी प्रथमपासूनच आहेत. याबाबत अनेकदा तक्रारी झाल्या आहेत. न्यायालय, हरित लवादाकडे दावे दाखल केले तरी महामार्ग प्राधिकरण त्रुटी दूर करण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करत आहे. महामार्गामुळे त्या परिसराचे दोन भाग होतात. भर वेगात जाणारी वाहने, रात्रीच्या वेळी वाहनांच्या दिव्यातून पडणारा प्रखर प्रकाश, आवाज यामुळे प्राण्यांना महामार्ग ओलांडून जाणे अशक्य होऊन बसते. तरीही प्राण्यांनी मार्ग ओलांडण्याचा प्रयत्न केला, तर वाहनांच्या धडकेत यापूर्वीही अनेक प्राण्यांचा मृत्यू झालेला आहे. मृत्यू झालेल्या प्राण्यांमध्ये बिबटे, तरस यांसह काही छोट्या मोठ्या प्राण्यांचा समावेश आहे.

# मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांचा राजीनामा

## राजीनाम्यानंतर राहुल गांधींचे मोदींना आवाहन

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी राजभवनात जाऊन राज्यपाल अजय कुमार भल्ला यांची भेट घेतली आणि मुख्यमंत्री पदाचा आपला राजीनामा दिला. आजच सिंह यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर विरोधकांकडून त्यांच्यावर टीका केली जात होती. तसेच सूत्रांच्या माहितीनुसार १२ आमदारही नेतृत्व बदलासाठी दबाव टाकत होते.**



भाजपामध्ये वाढता अंतर्गत रोष शांत करण्यासाठी एन. बिरेन सिंह यांनी मुख्यमंत्रीपद सोडले आहे. यानंतर काँग्रेसकडून अविश्वास प्रस्ताव मांडला जाऊ शकतो. बिरेन सिंह यांनी राजीनामा दिला तेव्हा मणिपूर भाजपाचे अध्यक्ष ए. शारदा, भाजपा खासदार संबित पात्रा आणि किमान १९ आमदार देखील उपस्थित होते. राज्यपालांना सुपूर्द केलेल्या आपल्या राजीनाम्यात एन. बिरेन सिंह म्हणाले आहे की, मी मणिपूरी व्यक्तीच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारने वेळेवर केलेल्या हस्तक्षेपाबद्दल आभारी आहे. सरकारने वेगवेगळ्या विकास कामांना गती दिली आणि विविध योजना लागू केल्या. एन. बिरेन सिंह म्हणाले की, केंद्र सरकारच्या सातत्यपूर्ण मदत आणि मार्गदर्शनामुळे मणिपूरच्या विकास आणि समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली.कॉनराड संगम यांच्या नॅशनल पीपल्स पार्टीने (NPP) ने पाठिंबा काढून घेतला असला तरीदेखील आमदारांनी नेतृत्व बदलाची मागणी केली होती. जर फ्लोर टेस्ट झाली असती तर असमाधानी आमदार पक्षाचा व्हिप मान्य न करण्याची शक्यता होती, त्यामुळे सरकार संकटात येऊ शकले असते. या पासून बचावासाठी मुख्यमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. एन. बिरेन सिंह यांनी पक्षाच्या केंद्रिय नेतृत्वाबरोबर चर्चा केल्यानंतरच राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच एन. बिरेन सिंह हे मणिपूरमध्ये झालेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर देखील विरोधकांच्या निशाण्यावर होते. विरोधकांकडून बऱ्याचदा त्यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली आहे.एन बिरेन सिंह यांनी आज सकाळी दिल्लीत भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. या बैठकीत राज्याच्या राजकीय स्थिती आणि संभाव्य पर्यायांवर चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान भाजपाच्या सुत्रांनुसार तब्बल १२ आमदार नेतृत्व बदलाच्या मागणीसाठी दबाव टाकत होते. तर ६ आमदार तटस्थ होते."राज्यात शांतता प्रस्थापित करणे आणि मणिपूरच्या लोकांच्या जखमा भरून काढण्यासाठी काम करण्याला आता प्राधान्य दिलं पाहिजे. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी ताबडतोब मणिपूरला भेट द्यावी, लोकांचे म्हणणे ऐकावे आणि शेवटी सामान्य स्थिती परत आणण्यासाठी योजना आखावी", असं आवाहनही त्यांनी केली. राज्यपालांना सुपूर्द केलेल्या आपल्या राजीनाम्यात एन. बिरेन सिंह म्हणाले आहे की, मी मणिपूरी व्यक्तीच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारने वेळेवर केलेल्या हस्तक्षेपाबद्दल आभारी आहे. सरकारने वेगवेगळ्या विकास कामांना गती दिली आणि विविध योजना लागू केल्या. एन. बिरेन सिंह म्हणाले की, केंद्र सरकारच्या सातत्यपूर्ण मदत आणि मार्गदर्शनामुळे मणिपूरच्या विकास आणि समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली.एन बिरेन सिंह यांनी आज सकाळी दिल्लीत भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती.

### राजीनामा का दिला?

कॉनराड संगम यांच्या नॅशनल पीपल्स पार्टीने (NPP) ने पाठिंबा काढून घेतला असला तरीदेखील आमदारांनी नेतृत्व बदलाची मागणी केली होती. जर फ्लोर टेस्ट झाली असती तर असमाधानी आमदार पक्षाचा व्हिप मान्य न करण्याची शक्यता होती, त्यामुळे सरकार संकटात येऊ शकले असते. या पासून बचावासाठी मुख्यमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. एन. बिरेन सिंह यांनी पक्षाच्या केंद्रिय नेतृत्वाबरोबर चर्चा केल्यानंतरच राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच एन. बिरेन सिंह हे मणिपूरमध्ये झालेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर देखील विरोधकांच्या निशाण्यावर होते. विरोधकांकडून बऱ्याचदा त्यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली आहे.मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी राजभवनात जाऊन राज्यपाल अजय कुमार भल्ला यांची भेट घेतली आणि मुख्यमंत्री पदाचा आपला राजीनामा दिला. आजच सिंह यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर विरोधकांकडून त्यांच्यावर टीका केली जात होती.

# ही तर 'आप'च्या शेवटाची सुरुवात

## अरविंद केजरीवालांच्या जुन्या सहकाऱ्याची खोचक टीका

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आम आदमी पक्षाचे सहसंस्थापक प्रशांत भूषण एकेकाळी अरविंद केजरीवाल यांच्या खांद्याला खांदा लढताना दिसत होते. मात्र कालांतराने त्यांची पक्षातून हकालपट्टी झाली. दिल्ली विधानसभेतील पराभवाला अरविंद केजरीवाल हेच जबाबदार असल्याचे सांगताना प्रशांत भूषण म्हणाले की, केजरीवाल यांनी 'आप'ला एकाच व्यक्तीचे वर्चस्व असलेला आणि सर्वात भ्रष्ट पक्ष बनविला.**

केजरीवाल यांनी स्वतःसाठी शीशमहाल बांधला आणि ते आलिशान गाड्यातून प्रवास करत असत, अशीही टीका प्रशांत भूषण यांनी केली. दिल्ली विधानसभेचा निकाल लागल्यानंतर प्रशांत भूषण यांनी एक्सवर एक पोस्ट लिहिली आहे. ते म्हणाले, 'आप'च्या दिल्लीतील पराभवासाठी अरविंद केजरीवाल जबाबदार आहेत. प्रस्थापित पक्षांना पर्याय देण्यासाठी आम आदमी पक्षाची स्थापना करण्यात आली होती. मात्र पक्षाची कार्यपद्धती पारदर्शक, जबाबदार आणि लोकतांत्रिक न ठेवता केजरीवाल यांनी पक्षाला स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवले.



पक्षाला अपारदर्शक आणि भ्रष्ट स्वरुपात रूपांतरित केले. ज्यांनी लोकपालची मागणी केली होती, त्यांनीच लोकपाल काढून टाकला.प्रशांत भूषण पुढे म्हणाले, "केजरीवाल यांनी स्वतःसाठी ४५ कोटींचा शीशमहाल बांधला. ते प्रवासासाठी आलिशान गाड्या वापरत होते. 'आप'ने स्थापन केलेल्या तज्ज्ञ समित्यांचे ३३ तपशीलवार अहवाल त्यांनी रद्द केले. वेळ आली की, पक्ष सोयीस्कर धोरण स्वीकारेल. त्यांना वाटते की, केवळ प्रचार आणि भाषणबाजीने राजकारण करता येते. ही 'आप'च्या शेवटाची सुरुवात आहे."प्रशांत भूषण यांनी आपल्या पोस्टसह २०१५ साली अरविंद केजरीवाल यांना उद्देशून लिहिलेल्या एका खुल्या पत्राची लिंकही शेअर केली आहे. २०१५ साली पक्षविरोधी कारवाया केल्याचा आरोप करत प्रशांत भूषण आणि योगेंद्र यादव यांना पक्षातून बाहेर काढण्यात आले होते.

### आप व काँग्रेसने आघाडी करायला हवी

स्वच्छ, तत्वनिष्ठ राजकारणाचे स्वप्न दुःखद स्वप्नात बदलू शकते, असा इशारा भूषण यांनी या पत्रातून तेव्हाच केजरीवाल यांना दिला होता. भाजपाने दिल्लीत तब्बल २७ वर्षांनंतर विजय मिळविला आहे. ७० पैकी ४८ जागा जिंकत भाजपाने बहुमताने सरकार स्थापन केले आहे. तर २०२० मध्ये ६२ जागा जिंकलेल्या आम आदमी पक्षाला यावेळी फक्त २२ जागांवर समाधान मानावे लागले आहे. दरम्यान दिल्लीत पराभव झाल्यानंतर इंडिया आघाडीतील अनेकांनी आप व काँग्रेसने आघाडी करायला हवी होती, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

# जानकी ऐश्वर्याचा खोटेपणा उघड करणार

'घरोघरी मातीच्या चुली' ही लोकप्रिय मालिकांपैकी एक आहे. जानकी व हृषिकेशची जोडी प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसते आहे. या मालिकेत सातत्याने नाट्यमय घडामोडी घडताना दिसतात. काही दिवसांपूर्वीच ऐश्वर्याच्या कट-कारस्थानामुळे जानकी व हृषिकेश हे घराबाहेर पडले आहेत. आता सारंगदेखील ऐश्वर्याच्या म्हणण्याप्रमाणे वागत असल्याचे दिसत आहे. तोदेखील इतरांना फसवून खोटे वागत असल्याचे पाहायला मिळत आहे. आता श्री व सौ या स्पर्धेत जानकी ऐश्वर्याचा खोटेपणा सर्वांसमोर उघड करणार असल्याचे पाहायला



मिळत आहे.स्टार प्रवाहने घरोघरी मातीच्या चुली या मालिकेचा एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये श्री व सौ ही स्पर्धा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. सारंग व ऐश्वर्या दोघांच्याही कानावर हेडफोन आहेत. त्यामध्ये मोठ्या आवाजात गाणी सुरू आहेत. सारंग जे सांगेल, ते ऐश्वर्यने ओठांच्या हालचालीवरून समजून ते वाक्य, तसेच मोठ्याने म्हणायचे आहे. ऐश्वर्याची एकापाठोपाठ सर्वच वाक्ये बरोबर आल्यानंतर तिथेच बसलेल्या जानकीला संशय येतो. ती हृषिकेशला म्हणते, "हेडफोन्समध्ये एवढ्या मोठ्याने म्युझिक सुरू असतानासुद्धा हिला सगळं कसं कळतं?" ऐश्वर्याचा खोटेपणा उघड करण्यासाठी ते ऐश्वर्याच्या वडिलांचे नाव घेते. वडिलांचे नाव ऐकताच ऐश्वर्या आनंदाने अरे डॅडा आले, असे म्हणत वळते.

# सनम तेरी कसम' चित्रपटाचा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

पाकिस्तानी अभिनेत्री मावरा होकेन आणि हर्षवर्धन राणेचा 'सनम तेरी कसम' चित्रपट २०१६मध्ये प्रदर्शित झाला होता. त्यावेळी या चित्रपटातील गाणी सुपरहिट झाली होती. पण, चित्रपटाला पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यामुळे 'सनम तेरी कसम' चित्रपटाच्या पुढे फ्लॉपची पाठी लागली. मात्र, नऊ वर्षांनंतर 'सनम तेरी कसम' चित्रपटाला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळताना दिसत आहे. आतापर्यंत पुनःप्रदर्शित झालेल्या चित्रपटांमध्ये सर्वाधिक कमाई 'सनम तेरी कसम' चित्रपट करताना दिसत आहे. एवढंच नाहीतर या चित्रपटाने स्वतःचे जुने रेकॉर्ड मोडले आहेत.७ फेब्रुवारीला पुन्हा प्रदर्शित झालेला 'सनम तेरी कसम' चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद चित्रपटाला मिळताना दिसत आहे. सध्या या चित्रपटाला मिळत असलेला प्रतिसाद पाहून मावरा होकेन आणि हर्षवर्धन राणे यांना आश्चर्याचा धक्काच बसला आहे. त्यामुळे दोघं सोशल मीडियावर सतत पोस्ट शेअर करून प्रेक्षकांचे आभार मानत आहेत.७ फेब्रुवारीला प्रदर्शित झाल्यानंतर 'सनम तेरी कसम' चित्रपटाने पहिल्या दिवशी ५.१४ कोटींची कमाई केली होती. तर दुसऱ्या दिवशी कमाईत वाढ झाली. ६.२२ कोटींचा व्यवसाय 'सनम तेरी कसम' चित्रपटाने दुसऱ्या दिवशी केला. त्यामुळे या चित्रपटाने दोन दिवसात बॉक्स

# सलमानने जवळून पाहिलेला मृत्यू

अभिनेता सलमान खानने नुकतीच डंब बिर्याणी या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. हे यूट्यूब चॅनेल सलमान खानच्या पुतण्याचे आहे. या पॉडकास्टमध्ये सलमान खानने विविध विषयांवर गप्पा मारल्या. तरुण पिढीला काही महत्त्वाचे सल्ले दिले. माणसामधील उत्साह सर्वांत महत्त्वाचा असतो, तो कधी संपला नाही पाहिजे. नाही तर तुम्ही वयाच्या आधी वृद्ध होता, असे म्हणत सलमान खानने त्याची मते व्यक्त केली. त्याबरोबरच या पॉडकास्टमध्ये सलमान खानने मृत्यू जवळून पाहिल्याचे म्हणत एक घटनादेखील सांगितली आहे.सलमान खानने डंब बिर्याणी या पॉडकास्टमध्ये एका पुरस्कार सोहळ्यानंतर श्रीलंकेतून परतताना काय घडले होते याबाबतचा किस्सा सांगितला. सलमान खानने म्हटले की, आयफा पुरस्कार सोहळा संपल्यानंतर श्रीलंकेतून विमानातून परत येत होतो. सगळे जण हसत होते, गप्पा चालू होत्या. अचानक विमानाच्या इंजिनाचा आवाज येऊ लागला. तो आवाज काही क्षणांसाठी नव्हता. तर ४५ मिनिटे विमानाच्या इंजिनाचा आवाज येत होता.

# अफेअर अन् लग्न



प्यार का पंचनामा' फेम लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री सोनाली सेहगल आई होणार आहे. वर्षभरापूर्वी सोनालीने व्यावसायिक बॉयफ्रेंड आशीष सजनानीशी लग्न केलं. आता तिने गूड न्यूज दिली आहे. सोनालीने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट करून याबद्दल चाहत्यांना माहिती दिली आहे. 'गोपी बहू' म्हणजेच देवोलिना भट्टाचार्जीने प्रेग्नेंसीची घोषणा केली होती. आता एका दिवसानंतर बी-टाऊनची प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली सहगल हिने आनंदाची बातमी दिली आहे. लग्नाच्या एक वर्षानंतर सोनाली आई होणार आहे. ३५ वर्षीय सोनाली सहगलने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट घोषणा करून गूड न्यूज दिली आहे. तिने तीन फोटो शेअर केले आहेत, ज्यात एका फोटोमध्ये तिचा बेबी बंप दिसतोय आणि ती काहीतरी खाताना दिसत आहे. तर तिच्या शेजारी तिचा पती बिअरची बाटली आणि हातात एक बाळाच्या दुधाची बाटली धरलेला दिसत आहे. अभिनेत्रीच्या समोर बेडवर चिप्स, बिस्किट व पुस्तकं दिसत आहेत.सोनालीने कॅप्शनमध्ये लिहिलं, "बिअरच्या बाटल्यांपासून बाळाच्या दुधाच्या बाटलीपर्यंत आशिषचे आयुष्य बदलणार आहे. माझ्या बाबतीत काही गोष्टी तशाच राहतील. आधी मी माझ्यासाठी खायचे आता दोघांसाठी खाते. दुसरीकडे समशेर (सोनालीचा श्वान) चांगला मोठा भाऊ होण्यासाठी नोट्स काढत आहे. मी खूप कृतज्ञ व आनंदी आहे. प्रार्थना करा." सोनालीच्या बाळाचा जन्म डिसेंबरमध्ये होईल असंही तिने सांगितलं.सोनाली सहगलने ७ जून २०२३ रोजी बिझनेसमन आशिष सजनानीशी लग्न केलं. या जोडप्याने पाच वर्षे एकमेकांना गुपचूप डेट केलं होतं. त्यानंतर मुंबईत लग्नगाठ बांधली. प्यार का पंचनामा' फेम लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री सोनाली सेहगल आई होणार आहे.



# मृण्मयीचा महिन्याचा खर्च माहितीये का?

अभिनेत्री मृण्मयी देशपांडे नुकतीच एक राधा एक मीरा या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. महेश मांजरेकर दिग्दर्शित या चित्रपटात मृण्मयी देशपांडेसह अभिनेता गश्मीर महाजनी व सुरभी भोसले प्रमुख भूमिका साकारत आहेत. या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. आता मात्र मृण्मयी देशपांडे वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. एका मुलाखतीत तिने तिचा महिन्याचा खर्च किती असतो, हे सांगितले आहे.अभिनेत्री मृण्मयी देशपांडे व तिचा पती स्वप्नील राव यांनी नुकताच आरपार या यूट्यूब चॅनेलशी संवाद साधला. त्यावेळी मृण्मयीने म्हटले की, शेतामध्ये आल्यानंतर आमचा जो आठवड्याचा खर्च आहे, तो जवळजवळ ५००-६०० रुपये आहे. महिन्यात आम्ही २००० रुपयांत आनंदात जगतो. गेल्या पाच वर्षांत मला आठवत नाही की, मी वारंवार कपडे विकत घेतले. माझा वर्षाचा कपड्यांचा खर्च जवळजवळ २० हजार रुपये असेल. माझ्या प्रोफेशनला हा खर्च नगण्य आहे. त्याव्यतिरिक्त मला काही लागतच नाही", असे म्हणत अभिनेत्रीने तिचा महिन्याचा खर्च सांगितला आहे. याबरोबरच, त्यांनी त्यांच्या शेतीविषयीदेखील माहिती दिली. एकाचवेळी ते विविध प्रकारची उत्पादने घेत असल्याचे म्हटले. स्ट्रॉबेरीसह विविध इतर फळे, फळभाज्या, कांदा, झेंडू, माठ, लसून, मिरची अशी विविध उत्पादने घेत असल्याचे या जोडप्याने सांगितले. त्यांनी सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यास सुरूवात केली आहे.

# भारताचा इंग्लंडवर मालिका विजय!

## हिटमॅनची फटकेबाजी अन् जडेजाची फिरकी ठरली प्रभावी

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कटकमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने इंग्लंडचा ४ विकेट्सने पराभव केला. यासह, टीम इंडियाने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २-० अशी अभेद्या आघाडी घेतली आहे. भारतीय संघाच्या विजयाचा सर्वात मोठा हिरो रोहित शर्मा राहिले, ज्याने ९० चेंडूत ११९ धावांची शानदार आणि संस्मरणीय खेळी केली. त्याच्याशिवाय शुबमन गिलनेही अर्धशतकी खेळी करत संघाच्या विजयात मोठे योगदान दिले.**




रवींद्र जडेजाने ही गोलंदाजीत ३ विकेट्स घेत महत्त्वाची भूमिका बजावली. यासह भारताने सलग सातव्यांदा मालिका विजय नोंदवला. कटकमधील बाराबती स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या इंग्लंडने बेन डकेट आणि जो रूट यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ४९.५ षटकांत १० गडी गमावून ३०४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, रोहित शर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने ४४.३ षटकांत सहा गडी गमावून ३०८ धावा केल्या आणि सामना जिंकला. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली. रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी १३६ धावांची भागीदारी केली, जी जेमी ओव्हरटनने तोडली.ओव्हरटनने १७ व्या षटकात युवा फलंदाज गिलला बाद केले. २५ वर्षीय फलंदाज ५२ चेंडूत ६० धावा काढल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावले. गिलने ४५ चेंडूत त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील १५ वे अर्धशतक पूर्ण केले.तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेला विराट कोहली पुन्हा एकदा ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर बाद झाला. आदिल रशीदने त्याला आपला बळी बनवले. तो फक्त पाच धावा करू शकला.यानंतर श्रेयस अय्यरने पदभार स्वीकारला. त्याने तिसऱ्या विकेटसाठी हिटमॅनसोबत ७० धावांची भागीदारी केली. यादरम्यान, भारतीय कर्णधाराने ७६ चेंडूत त्याचे ३२ वे शतक पूर्ण केले. तो ९० चेंडूत १२ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ११९ धावांची शानदार खेळी खेळून पॅव्हेलियनमध्ये परतला. डावाच्या ३० व्या षटकात लियाम लिव्हिंगस्टोनच्या चेंडूवर आदिल रशीदने त्याला झेलबाद केले. इंग्लंडविरुद्ध, श्रेयस अय्यरने ४४, हार्दिक पंड्याने १०, अक्षर पटेलने नाबाद ४१ आणि रवींद्र जडेजाने ११ धावा केल्या. इंग्लंडकडून जेमी ओव्हरटनने दोन तर गस ॲटकिन्सन, आदिल रशीद आणि लियाम लिव्हिंगस्टोनने प्रत्येकी एक विकेट घेतली. आता दोन्ही संघांमधील तिसरा सामना १२ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमध्ये खेळला जाईल. या सामन्यात भारतीय संघ इंग्लंडला विजयासह व्हाईटवॉश करण्याच्या उद्दिष्टाने मैदानात प्रवेश करेल.कटकमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने इंग्लंडचा ४ विकेट्सने पराभव केला. यासह, टीम इंडियाने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २-० अशी अभेद्या आघाडी घेतली आहे. भारतीय संघाच्या विजयाचा सर्वात मोठा हिरो रोहित शर्मा राहिले, ज्याने ९० चेंडूत ११९ धावांची शानदार आणि संस्मरणीय खेळी केली. त्याच्याशिवाय शुबमन गिलनेही अर्धशतकी खेळी करत संघाच्या विजयात मोठे योगदान दिले. त्याचबरोबर रवींद्र जडेजाने ही गोलंदाजीत ३ विकेट्स घेत महत्त्वाची भूमिका बजावली. यासह भारताने सलग सातव्यांदा मालिका विजय नोंदवला. कटकमधील बाराबती स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या इंग्लंडने बेन डकेट आणि जो रूट यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ४९.५ षटकांत १० गडी गमावून ३०४ धावा केल्या होत्याभारताने ४४.३ षटकांत सहा गडी गमावून ३०८ धावा केल्या आणि सामना जिंकला.

### सचिन तेंडुलकरचा मोडला विक्रम

भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली.रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी १३६ धावांची भागीदारी केली, जी जेमी ओव्हरटनने तोडली. रोहितने आता २६७ सामन्यांच्या २५९ डावांमध्ये ३३८ षटकार ठोकले आहेत. तर गेलने ३०१ सामन्यांच्या २९४ डावांमध्ये ३३१ षटकार मारले आहेत. या यादीत शाहिद आफ्रिदी ३५१ षटकारांसह पहिल्या क्रमांकावर आहे.रोहित शर्माने भारताचा दिग्गज सलामीवीर सचिन तेंडुलकरच्या मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. सचिन तेंडुलकरने ३४६ सामन्यांत ४८.०७ च्या सरासरीने १५,३३५ धावा केल्या आहेत. ३७ वर्षीय रोहित तेंडुलकरचा हा धावांचा विक्रम मोडण्यापासून ५० धावा मागे होता. यासह रोहित शर्माने इंग्लंडविरूद्ध सामन्यात आपले अर्धशतक पूर्ण करत सचिनला मागे टाकलं आहे. वीरेंद्र सेहवाग हा भारतीय सलामीवीरांमध्ये सर्वाधिक धावा करणारा आंतरराष्ट्रीय खेळाडू आहे ज्याने ३२१ सामन्यांत ४१.९० च्या सरासरीने १५,७५८ धावा केल्या आहेत.

---

# सामना अचानक थांबवल्याने रोहित शर्मा वैतागला

## मैदानातील फ्लडलाईट अचानक बंद पडल्याने थांबला सामना

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत वि इंग्लंड दुसरा कसोटी सामना कटकमध्ये खेळवला जात आहे. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ३०४ धावा केल्या. यासह इंग्लिश संघाने भारताला विजयासाठी ३०५ धावांचे आव्हान दिले आहे. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी रोहित शर्मा आणि शुबमन गिलची जोडी मैदानात उतरली.**




रोहित-गिलने दणक्यात सुरूवात केली, तर रोहितने चौकार षटकारांचा पाऊस पाडला. पण अचानक सामना थांबवण्यात आला असून दोन्ही संघांचे खेळाडू डगआऊटमध्ये परतले.रोहित आणि गिलने भारताच्या फलंदाजीची चांगली सुरूवात केली. रोहित शर्मादेखील चांगल्या लयीत दिसला होता आणि त्याने ३ मोठे षटकार खेचत दणक्यात सुरूवात केली. पण सातवे षटक सुरू होताच अचानक सामना थांबला.६ षटकं झाल्यानंतर मैदानातील एक फ्लडलाईट अचानक बंद पडला आणि त्यामुळे सामना काही वेळ थांबवण्यात आला. त्यानंतर सामना पुन्हा सुरू झाला आणि गिलने साकिब महमूदच्या गोलंदाजीवर एक धाव घेत रोहितला स्ट्राईक दिली. रोहित फलंदाजीसाठी तयार होत असताना पुन्हा ती फ्लडलाईट बंद झाली आणि रोहितने डोकं हलवत निराशा व्यक्त केली. तितक्यात मैदानावरील प्रेक्षकांनी मोबाईलचे फ्लॅश सुरू केले.खेळाडू बऱ्याच वेळ मैदानात लाईट सुरू होण्याची वाट पाहत होते. तितक्यात काही लाईट सुरू झाल्या पण अचानक फ्लडलाईटचा तो पूर्ण स्तंभच बंद पडला. आता ती फ्लडलाईट सुरू करण्याचं काम सुरू झालं.

### पंचांना बोलवून त्यांच्याशी चर्चा

पाहताच रोहित शर्मा वैतागला आणि त्याने पंचांना बोलवून त्यांच्याशी चर्चा करायला सुरूवात केली. वैतागलेल्या रोहितशी चर्चा केल्यानंतर दोन्ही संघांचे खेळाडू मैदानाबाहेर जाऊ लागले. त्यानंतर दोन्ही संघाचे खेळाडू डगआऊटमध्ये परतल्यानंतर जोस बटलरने येऊन रोहितशी चर्चा केली. रोहित, गिल आणि साकिब महमूद पंचांशी चर्चा करत असताना इंग्लंडचा कर्णधार म्हणून तिथे उपस्थित नव्हता.रोहित आणि गिलने मिळून ६ षटकांमध्ये ४७ धावा केल्या होत्या. ज्यात रोहित शर्मा १८ चेंडूत ३ षटकार आणि १ चौकारासह २९ धावा करत खेळत आहे, तर गिलने १९ चेंडूत ३ चौकारांसह १७ धावा केल्या आहेत.

### लोकप्रतिनिधींनी प्रश्नांची प्रभावी मांडणी करून

# लोकहिताच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करावे!

## डॉ. नीलम गोऱ्हे; "एमआयटीवर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी" येथे 'क्षमता बळकटीकरण समारंभ





**। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**एम आय टी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे येथे आयोजित 'क्षमता बळकटीकरण समारंभ, भारत' या कार्यक्रमात महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी 'विधीमंडळात यशस्वी होण्यासाठी ऊत्तम संसदीय आयुधे'या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आमदार व लोकप्रतिनिधींना संसदीय कार्यपद्धती, प्रभावी कायदेविषयक प्रक्रिया आणि जनहिताच्या मुद्द्यांवरील प्रभावी सादरीकरण यासंदर्भात महत्वपूर्ण माहिती दिली.**

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा. श्री. राम शिंदे, लोकसभेच्या माजी अध्यक्ष मा. श्रीमती सुमित्रा महाजन, हिमाचल प्रदेश विधानसभा अध्यक्ष कुलदीपसिंग पठाणिया, झारखंड विधानसभा अध्यक्ष माननीय रवींद्रनाथ महातो, MIT चे कार्यकारी अध्यक्ष राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर एम चिटणीस तसेच, संपूर्ण भारतातील लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "विधानसभा आणि विधान परिषदेतील कायदे काही प्रमाणात समान असू शकतात, परंतु प्रत्येक राज्याची परिस्थिती आणि गरज वेगळी असल्याने त्यांची अंमलबजावणीही वेगवेगळी असते. त्यामुळे एखाद्या राज्यात यशस्वी झालेला निर्णय किंवा धोरण दुसऱ्या राज्यात तितक्याच प्रभावीपणे लागू होईलच असे नाही. त्यामुळे प्रत्येक राज्याने आपल्या गरजेनुसार धोरणे आणि योजनांची अंमलबजावणी केली पाहिजे." त्याचबरोबर तारांकित आणि अतारांकित प्रश्नांविषयी मार्गदर्शन करताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, "लोकप्रतिनिधींनी ४५ दिवस आधीच प्रश्नांची पूर्वतयारी करावी. ज्या विषयांवर जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घ्यावेत, त्या मुद्द्यांवर ठोस पावले उचलावीत. प्रभावी प्रश्नमांडणीमुळे शासनावर दबाव निर्माण होतो आणि लोकहिताच्या योजना वेगाने कार्यान्वित करता येतात." या संमेलनाद्वारे विविध राज्यांतील लोकप्रतिनिधींमध्ये संसदीय कार्यपद्धतीची देवाण-घेवाण झाली. त्यातून संसदीय व्यवस्थेतील प्रभावी कार्यपद्धतीसाठी उपयुक्त माहिती मिळाली.

---

# आरटीई प्रवेशासाठी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये!

## शिक्षण संचालकांचे पालकांना आवाहन...

**। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शक प्रक्रिया असून या प्रक्रियेत लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रवेश पात्र लाभार्थी व प्रतिक्षाधिन लाभार्थी याची शाळानिहाय यादी घोषित केली जाते. यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप केला जात नाही. पालकांनी बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये असे आवाहन शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी केले आहे.**




बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार आरटीई २५ टक्के प्रवेश वंचित व दुर्बल घटकातील मुला-मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. पालकांना प्रलोभन देण्याचे गैरप्रकार निदर्शनास आल्यास याबाबत संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), प्रशासन अधिकारी मनपा, नपा, संबंधित विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे, आयुक्त (शिक्षण), पुणे (EDUCOMMOFFICE@GMAIL.COM) यांचेकडे ई-मेलद्वारे अथवा समक्ष आपली तक्रार पुराव्यासह नोंदविण्यात यावी.

असा कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितावर नियमानुसार फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असेही शिक्षण संचालक गोसावी यांनी कळविले आहे.

# 31 लाखांवर विद्यार्थी देणार दहावी-बारावीची परीक्षा

**। पुणे । प्रतिनिधी महाईन्यूज ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेत यंदा 14 लाख 94 हजार बारावीचे विद्यार्थी, तर 16 लाख 7 हजार दहावीचे, असे एकूण 31 लाखांवर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षेसाठी तब्बल 1 लाख 80 हजारांहून अधिक मनुष्यबळ कार्यरत राहणार आहे. राज्य मंडळाकडून परीक्षांची आवश्यक सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून, परीक्षा सुरळीत पार पाडण्यावर राज्य मंडळाचा भर असल्याचे राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी राज्य मंडळाने यंदा जोरदार तयारी केली आहे. बारावीची परीक्षा 11 फेब्रुवारी ते 18 मार्च आणि दहावीची परीक्षा 21 फेब्रुवारी ते 17 मार्चदरम्यान घेण्यात येणार आहेत. त्यानुसार दोन्ही इयत्तांच्या विद्यार्थ्यांना हॉलतिकीट उपलब्ध करून देण्यात आले आहे. दहावी-बारावीच्या परीक्षेत दरवर्षी कॉपी केसेस, बोगस विद्यार्थी सापडणे, समूह कॉपी, पेपर व्हायरल होणे, असे प्रकार सर्रास घडताना दिसतात. यंदा मात्र राज्य मंडळ गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 100 दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली दहावी-बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात, यासाठी महाराष्ट्र शासन व राज्य मंडळ प्रयत्नशील आहे. यासंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दूरचित्र प्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली. या दूरचित्र प्रणाली बैठकीमध्ये कॉपी प्रकरणास पूर्णत: प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!